# दिनांक ३०/०३/२०२५ रोजी झालेल्या खातेप्रमुख व गट विकास अधिकारी सभेचे इतिवृत्त

खातेप्रमुख यांची मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्या अंतर्गत केलेल्या कामकाजाचा आढावा घेणेकरीता रविवार दिनांक ३०/०३/२०२५ रोजी दु. १२.०० वा. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात आढावा सभा संपन्न झाली. सदर सभेत मा. श्री. रविंद्र खेबुडकर, (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी शासन निर्णय दिनांक १३/०१/२०२५ नुसार व शासनाकडून दिलेल्या गुणांकनानुसार १०० दिवसांच्या कृती आराखडयामध्ये केलेल्या कामकाजाचा आढावा घेऊन खालीलप्रमाणे सूचना दिल्या.

| अ.क्र. | विषय | कार्यवाहीचा मुद्दा | पुर्तता करणारा विभाग/ अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | तालुका निहाय आढावा | गट विकास अधिकारी यांचा तालुका निहाय आढावा घेतला असता खालिलप्रमाणे केलेल्या कामकाजाची माहिती गट विकास अधिकारी यांनी माहिती दिली. | |
| | | **देवगड-** १.वेबसाईट तयार करण्यात आली असून अद्यावत करणेचे काम सुरु आहे. फोटो व व्हीडीओ अपलोड करण्याचे काम सुरु आहे. तरी उर्वरीत काम केव्हा पूर्ण करणार याची विचारणा केली. तरी या आठवडयात पूर्ण करणार असे ग.वि.अ. देवगड यांनी सांगितले २. सन २०२२-२३ अखेर चे अभिलेख वर्गीकरण करण्यात आले असे सांगितले. ३.आपले सरकार पोर्टलवरील ९ पैकी ९ संदर्भ निकाली काढण्यात आले असे सांगितले तथापी ७ तक्रारी कोणत्या आहेत त्या सांगता आल्या नाहीत ४.तालुका अंतर्गत क्षेत्र भेटी देण्यात येत आहेत असे ग.वि.अ. यांनी सांगितले ५. तालुका स्तरीय कर्मचारी यांना ID कार्ड तयार करण्यात आले असून ग्रामपंचायत अधिकारी यांना देखील देण्यात आले आहे असे सांगितले ६.नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत अभिलेख वर्गीकरण केलल्या नस्तींना QR कोड करण्याचे काम सुरु आहे असे ग.वि.अ. यांनी सांगतिले. | |
| | | **कणकवली-** १. वेबसाईट तयार करण्यात आली असून सर्व विभागांची माहिती अद्यावत करणेचे काम सुरु आहे. तसेच विविध Event अपलोड करण्याचे काम सुरु आहे. २.सुकर जिवनमान अंतर्गत अभ्यागतांसाठी कक्षस्थापन करण्यात आलेला आहे. त्यामध्ये योजनांची माहिती देण्यात येते. ३.अभिलेख वर्गीकरण २०२३ पर्यंत करण्यात आले आहे. २६९१ नस्ती नष्ट केलेल्या आहेत. तसेच जुन्या निर्लेखन योग्य जड वस्तू शिल्लक नाहीत. ४.आपले सरकार व पी.जी. पोर्टलवरील तक्रारी निरंक आहेत. स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असून महिला व पुरुष प्रसाधनगृहात स्वच्छता केली जाते.५. अभ्यागतांसाठी स्वतंत्र कक्ष तयार कण्यात आलेला आहे. ६. इमारतीच्या बाजूला झाडांची लागवड करण्यात आली असून त्याची जबाबदारी प्रत्येक कर्मचाऱ्याला देण्यात आली आहे. ७. तालुक्या अंतर्गत क्षेत्र भेटी घेतल्या असून योग्य त्या सूचना दिल्या आहेत. ८.नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये महीलांचा मेळावा व प्रदर्शन घेतले आहे. तसेच सेस अनुदानातून महिलांना शिलाई मशिन व फॅशन डिझायनिंग कोर्सचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **कुडाळ व सावंतवाडी**- १. वेबसाईट तयार करण्यात आली असून माहिती अद्यावत करणेचे काम सुरु आहे. २. कुडाळ येथे योजनांच्या माहितीची LED Screen लावण्यात येणार आहे. ३. आपले सरकार व पी.जी. पोर्टलवरील तक्रारींचा निपटारा करण्यात येत आहे. ४. कुडाळ तालुक्यात ८ क्षेत्रीय भेटी घेण्यात आलेल्या आहेत. | |
| | | **दोडामार्ग**- १. वेबसाईट तयार करण्यात आली असून माहिती अद्यावत करणेचे काम सुरु आहे. तसेच लिंक अपडेट करण्याचे काम सुरु आहे. २. ग्रा.पं. भेटी देऊन दफ्तर तपासणी करण्यात आली आहे. ३. गुंतवणूक प्रोत्साहन अंतर्गत पावर ट्रिलर खरेदीसाठी अर्थ सहाय्य देण्यात आले असून दोडामार्ग येथील काजू कारखाना सुरु करण्यास येणाऱ्या अडचणी सोडवण्यात आल्याआहेत.४. नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत लाभार्थींचे प्रस्ताव टपालात न घेता प्रथम तपासले जातात व काही त्रृटी असल्यास तिथेच लाभार्थींना पूर्तता करण्यास सांगितले जाते. | |
| २. | | वरीलप्रमाणे गट विकास अधिकाऱ्यांनी केलेल्या कामांची माहिती घेतल्यानंतर सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी यांना खालीलप्रमाणे सक्त सूचना दिल्या. | |
| | १. | संकेतस्थळावर आवश्यक ती सर्व माहिती (ग्रामपंचायतींच्या माहितीसह) उदा. योजनांची माहिती, निविदा प्रसिध्द माहिती इ. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी |
| | २. | मा.विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग यांचे प्रतिनिधी हे दिनांक ०२.०४.२०२५ ते ०४.०४.२०२५ रोजी क्षेत्र भेट देण्यासाठी येत असून मा.विभागीय आयुक्त हे दिनांक १०.०४.२०२५ रोजी भेट देण्यासाठी तसेच केलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठी येणार आहेत. तरी त्याअनुषंगाने तयारी करण्यात यावी. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी |
| | ३. | आपले सरकार, पी.जी. पोर्टल व लोकशाही दिन व इतर प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने खात्री करुन तसेच तक्रारीमध्ये तथ्य आढल्यास सकारात्मक दृष्टीने निर्गत करण्यात याव्यात, केवळ पत्रव्यवहार करण्यात येऊन निकाली काढल्या जाऊ नयेत. सर्व खातेप्रमुख व गट विकास अधिकारी यांनी तक्रारींच्या दृष्टीने ग्राम स्तरावर लोकप्रतिनिधींची क्षेत्र भेट घेवून मार्गदर्शन करावे. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी |
| | ४. | सर्व गट विकास अधिकारी यांनी तालुका स्तरावरील ग्रामपंचायती, शाळा, अंगणवाडी, प्रा.आ.केंद्र यांची भेट घेऊन सर्व सोयी आहेत का याबाबत खात्री करणे, तसेच त्यांच्या अडचणी सोडविणे. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या योजनांतील लाभार्थी, विकास कामांना भेटी देण्यात येऊन १००% भौतिक व आर्थिक लक्षांक पूर्तता करणे. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी |
| | ५. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी यांनी १०० दिवसांच्या कृती आराखडयातील शिल्लक कामे दिनांक ०१ एप्रिल ते ०५ एप्रिल २०२५ पर्यंत पूर्ण करावीत. याबाबत निम्न स्वाक्षरीत हे स्वत: भेट देणार असून प्रत्यक्ष केलेल्या कामाची पाहणी करणार आहेत. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी |
| | ६. | दिनांक १०.०४.२०२५ पूर्वी सर्व ग्रामसेवक व सरपंच यांना आवश्यक ते सर्व प्रशिक्षण देण्यात यावे. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी |
| | ७. | कुडाळ, सावंतवाडी व देवगड याठिकाणी MIDC असून लहान व मोठया उद्योगांना भेटी देऊन त्यांच्या अडचणी सोडविणे. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी |

| | | | |
|---|---|---|---|
| | ८. | दिनांक ०२ एप्रिल २०२५ पासून सर्व कर्मचाऱ्यांना AI वापरण्याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असून सर्व कार्यालय प्रमुख व कर्मचारी यांनी याचा दैनंदीन कामकाजात वापर करावा. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी |
| | ९. | नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत सर्व योजनांचे Conversion करणे, शाळा व अंगणवाडी मध्ये मुलांचे कलागुणांचे विविध उपक्रम राबविणे यामध्ये मुलांचे साहीत्य संमेलन भरविणे इ. उपक्रम राबविण्यात यावेत. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी |
| | १०. | अभ्यागतांसाठीच्या प्रसाधनगृहांची दररोज दोन वेळा साफसफाई करणे. तसेच महिला व पुरषांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची व्यवस्था करणे. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी |
| | ११. | अभिलेख वर्गीकरणामध्ये QR कोडचा वापर करावा, कर्मचाऱ्यांसाठी सेवा निवृत्ती लाभ वितरणाचे कार्यक्रम आयोजित करावे, आरोग्य तपासणी पथकाची नेमणूक करुन नियमित आरोग्य तपासणी करणे, कला दालन तयार करणे, अभ्यागतांसाठी वर्तमानपत्र वाचनाची व्यवस्था व लायब्ररी तयार करणे, जि.प. इमारती समोरील जागेचे सुशोभीकरण करणे. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी |
| | १२. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी यांनी १०० दिवसांच्या कृती आराखडया अंतर्गत केलल्या कामाचे अद्यावत अहवाल, फोटो व व्हीडीओ अल्बम तसेच PPT तयार करुन ठेवावे. | सर्व खाते प्रमुख व गट विकास अधिकारी |

वरीलप्रमाणे सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन त्याची अद्यावत माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणेबाबत सूचना दिल्या व सभा संपल्याचे जाहीर करणेत आले.

(रविंद्र खेबुडकर, भा.प्र.से.) 31/03/2025

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग**

जा.क्र.सिंजिप/साप्रवि/नियोजन/इतिवृत्त/२०२५/ 2446
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग,
सिंधुदुर्गनगरी, दिनांक- ३०/०३/२०२५. 31

प्रत:- माहितीसाठी
१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचे स्वीय सहाय्यक यांचे मार्फत.
२) अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सिंधुदुर्ग यांना त्यांचे स्वीय सहाय्यकामार्फत.
३) प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी
१) खातेप्रमुख (सर्व) जिल्हा परिषद सिंधुदुर्ग.
२) गट विकास अधिकारी, पचायत समिती (सर्व).
३) स.प्र.अ. / क.प्र.अ., सा.प्र.वि., जि.प. सिंधुदुर्ग.